सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## धर्मादाय उप आयुक्त
## जळगाव विभाग, जळगाव यांचे कार्यालय

मायादेवी मंदिरासमोर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जवळ,
हतनुर वसाहत, महाबळ रोड, जळगाव-४२५ ००२. Email : supdtest.jg-mh@gov.in

जा. क्र./बाहय कर्मचारी/ 3266 /2026 दिनांक : 29.09.2026

प्रति,
मा.धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय:-** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव विभाग, जळगाव येथील आस्थापनेवर शिपाई (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) पदसंख्या 4 ही पदे कंत्राटी पद्धतीने भरणेकामी मागावयाच्या निविदा प्रक्रिया कार्यक्रम व निविदा सूचना धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बाबत.

**संदर्भ:-** 1) मुख्यालय मुंबई यांचे पत्र जा.क्र. आस्था/निरी -3/294/2024 दिनांक 12.01.2024.
2) मुख्यालय मुंबई यांचे पत्र जा.क्र. आस्था/निरी -3/6235/2024 दिनांक 20.01.2024.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सविनय सादर करण्यात येतें की, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव विभाग, जळगाव येथील आस्थापनेवर शिपाई (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) पदसंख्या 4 ही पदे कंत्राटी पद्धतीने बाह्ययंत्रणेव्दारे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया कार्यक्रम व निविदा सूचना धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी ही विनंती.

आपला विश्वासू

(राम अमीत लिप्ते)
धर्मादाय उप आयुक्त,
जळगाव विभाग, जळगाव

सोबत : निविदा प्रक्रीया कार्यक्रम व निविदा सूचना.

महाराष्ट्र शासन

धर्मादाय उप आयुक्त

जळगाव विभाग, जळगाव यांचे कार्यालय

मायादेवी मंदिरासमोर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जवळ,

हतनुर वसाहत, महाबळ रोड, जळगाव-४२५ ००२. Email : supdtest.jg-mh@gov.in

## सभेचे इतिवृत्त :-

दि. 17-09-2026 रोजी पार पडलेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे. तसेच आज दि.28-09-2026 रोजी वरील विषयाच्या अनुषंगाने सभा घेण्यात येत आहे.

कार्यालयीन टिप्पणी दि. 17-09-2026 मधील संदर्भ क्र. १ ते ११ च्या अनुषंगाने व त्यातील मार्गदर्शक सूचनेनुसार या कार्यालयामध्ये कंत्राटदार /ठेकेदार / कंपनी / संस्थेकडून यांच्याकडून निविदा मागवून बाह्ययंत्रणेव्दारे पदे भरणे बाबत निविदा प्रक्रिया कार्यक्रम राबविणे बाबत विचार विनिमय करण्यात आला त्यानुसार खालीलप्रमाणे समितीच्या एकमताने ठराव पारीत करण्यात आला.

**विषय क्र. 1 :- निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविण्याबाबत.**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय जळगाव विभाग जळगाव या कार्यालयासाठी शिपाई या पदांकरीता कर्मचारी दर्शविलेल्या रिक्त जागेच्या गोषवाऱ्याप्रमाणे 11 महिन्याच्या कालावधीकरिता सेवा पुरविण्यासाठी नोंदणीकृत कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्था यांचे कडून निविदा मागविण्यात येत आहे. याकरीता निविदेच्या अटी व शर्तीबाबत चर्चा करुन विचार विनिमय करण्यात आला व त्याचा मसुदा तयार करण्यात येऊन तो समितीसमोर वाचून कायम करण्यात आला.

**विषय क्र. 2 :- निविदा प्रक्रीया सूचना प्रसिध्द करावयाची ठिकाणे निश्चीत करणेबाबत.**

वरील प्रमाणे निविदा सूचना निर्गमित करणे तसेच निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविण्याबाबत विचार विनिमय करण्यात आला आहे. तसेच निविदा सूचना प्रसिध्द करावयाची ठिकाणे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली.

जाहीर नोटीस प्रसिद्ध करणे (कार्यालयीन नोटीस बोर्ड, जिल्हा माहिती कार्यालय, जिल्हा न्यायालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव, सदरील निविदा सूचना (http://charity.maharashtra.gov.in) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत समितीकडून ठराव घेण्यात आला. वरील सर्व बाबींना समितीने एकमताने मंजुरी दिलेली असून ठराव संमत करण्यात आलेला आहे.

**विषय क्र. 3 :- निविदा प्रक्रिया कार्यक्रम ठरविणेबाबत.**

त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया कार्यक्रम खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रम:

| अ. क्र. | तपशील | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहीर निविदा सूचना काढणे | 30/09/2026 | |
| 2 | जाहीर नोटीस प्रसिद्ध करणे (कार्यालयीन नोटीस बोर्ड, जिल्हा माहिती कार्यालय, जिल्हा न्यायालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव) | 30/09/2026 | |
| 3 | मा. धर्मादाय आयुक्त यांचे संकेतस्थळावर(http://charity.maharashtra.gov.in ) प्रसिद्ध करणे | 30/09/2026 | |
| 4 | निविदा स्विकारणे, कालावधी | 01/10/2026ते 09/10/2026 | |
| 5 | निविदा उघडण्याची तारीख किंवा निविदा मुदतवाढ आवश्यक असल्यास पुढील प्रक्रीया निश्चित करणे. | 12/10/2026 | |
| 6 | निविदा मुदतवाढ नसल्यास समितीच्या संमतीनुसार तुलनात्मक तक्ता तयार करणे | 22/10/2026 | |
| 7 | मा.ध.उ.आ.जळगाव यांच्या मान्यतेनंतर मा.धर्मादाय सह आयुक्त नाशिक , यांच्याकडे समितीचा अहवाल सादर करणे. | 26/10/2026 | |
| 8 | मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत शासनास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणे | मा.ध.स.आ. यांच्या मंजुरीनंतर | |

समितीकडून वरीलप्रमाणे तीन ठराव घेण्यात आले. वरील सर्व बाबींना समितीने एकमताने मंजुरी दिलेली असून ठराव संमत करण्यात आलेला आहे.

28/09/26 28/09/2026.

(राम अनंत लिप्ते)
अध्यक्ष

(वै.वि.राऊत-कारमोरे)
सचिव

28/09/26 28/09/2026

(आर.एम.कायटे)
सदस्य

(श.रा.पाटील)
सदस्य

(स.म.बाविस्कर)
सदस्य

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
**धर्मादाय उप आयुक्त, जळगांव यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव विभाग जळगांव**
**मायादेवी मंदिरासमोर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जवळ,**
**हतनुर वसाहत, महाबळ रोड, जळगाव - ४२५ ००२.**

## सभेचे इतिवृत्त :-

शिपाई या पदांची सेवा बाह्ययंत्रणे व्दारे उपलब्ध करून घेणेकरिता निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत समिती गठीत करण्यात आलेली आहे. या करीता आज दि.17.09.2026 रोजी वेळ 04.00 वाजता मा.धर्मादाय उप आयुक्त यांच्या दालनात समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर समितीच्या निदर्शनास असे आले आहे की, प्रस्तुत कार्यालयात सदयस्थितीमध्ये चार कंत्राटी कर्मचारी आहेत. प्रस्तुत कार्यालय दिनांक 20.06.2025 पासून नविन इमारतीमध्ये स्थलांतरीत झालेल असुन सदरची इमारत ही तळ मजला व चार मजले असे एकूण 5 मजल्यांची इमारत असल्यामुळे शिपायांअभावी न्यायिक व कार्यालयीन कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो. या कार्यालयामध्ये शिपाई पदांची कंत्राट संपल्यानंतर न्यायिक व कार्यालयीन कामकाज करण्यामध्ये अडचणी निर्माण होतील. शिपाई या पदाबाबत खालील नमूद प्रमाणे पदांच्या सेवा बाह्ययंत्रणे व्दारे भरण्याबाबत विचार विनिमय करण्यात आलेला आहे. टिपणीतील संदर्भ क्र. 1 ते 11 नुसार नमुद मार्गदर्शक सूचनांनुसार या कार्यालयामध्ये (कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थेकडून) यांच्याकडून निविदा मागवून बाह्ययंत्रणेव्दारे पदे भरणे प्रस्तावित आहे.

| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव विभाग, जळगाव | | | | |
|---|---|---|---|---|
| आ.क्र. | पदाचे नाव | भरावयाचे पदसंख्या | पदाचे स्वरूप | शैक्षणिक अर्हता |
| 1 | शिपाई | 4 | कंत्राटी स्वरुपात (११ महिने करार तत्वावर) पूर्णवेळ अकुशल पद | १२ वी उत्तीर्ण, पदविधर अंशकालीन असल्यास प्राधान्य. चारचाकी वाहन चालविण्याचा परवाना असल्यास प्राधान्य. संगणक ज्ञान असल्यास प्राधान्य. |

वरीलप्रमाणे पद भरण्यास व त्या अनुषंगाने शिपाई या पदांच्या सेवा बाह्ययंत्रणे व्दारे उपलब्ध करून घेणेकरिता निविदा प्रक्रिया राबविणे इत्यादी बाबींना समितीने एकमताने मंजुरी दिलेली असून ठराव संमत करण्यात आला असुन समितीची पुढील बैठक दिनांक 28.09.2026 रोजी सायंकाळी 04.00 वाजता मा.धर्मादाय उप आयुक्त, जळगाव यांचे दालनामध्ये आयोजित करण्याबाबत ठरले. तसेच पुढील सभेस निविदा सूचनेचा नमुना व वेळापत्रक तयार करुन त्यास अंतिम स्वरुप देणेबाबतचा विषय नियोजीत करण्यात आला आहे.

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| श्री राम अनंत लिप्ते, धर्मादाय उप आयुक्त | अध्यक्ष | 28/09/2026 |
| श्रीमती वैशाली व्ही. राऊत (कारमोरे), सहायक धर्मादाय आयुक्त | सचिव | .28/09/2026. |
| श्री आर.एम.कायटे, अधीक्षक | सदस्य | 28/09/26 |
| श्री श. रा. पाटील, अधीक्षक | सदस्य | 28/09/2026 |
| श्री.सं.म.बाविस्कर, लघुलेखक | सदस्य | |

# निविदा सूचना

| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव विभाग जळगाव | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **भरावयाचे पदसंख्या** | **पदाचे स्वरूप** | **शैक्षणिक अर्हता** |
| 1 | शिपाई (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) | 4 | कंत्राटी स्वरुपात (करार तत्वावर) पूर्णवेळ अकुशल पद | बारावी उत्तीर्ण, पदवीधर असल्यास प्राधान्य चार चाकी वाहन चालविण्याचा परवाना असल्यास प्राधान्य. |

वरील विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविण्यात आलेल्या आहेत.

निविदेसोबतच्या तांत्रिक व कायदेशीर अटी व शर्ती

**भाग-अ:**

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

निविदा पद्धत: निविदा दोन लिफाफा पद्धतीने स्वीकारली जाईल.

लिफाफा क्र. 1 (तांत्रिक लिफाफा): यामध्ये "शिपाई (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) पदासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता निविदा" तांत्रिक पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे असे नमुद करुन मोहोरबंद लिफाफा सादर करावा.

लिफाफा क्र. 2 (आर्थिक लिफाफा): यामध्ये फक्त दरपत्रक असेल व सदरचे दरपत्रकामध्ये प्रतिकर्मचारी आकारावयाचे शुल्क (दरमहा) सर्व वजावटी व करांसहीत दाखल करणे अनिवार्य राहील.

हे दोन्ही लिफाफे स्वतंत्र करून मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावेत, ज्यावर **"शिपाई** (बहुउददेशीय **गट-ड कर्मचारी) पदासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता निविदा" असे स्पष्टपणे नमूद करावे.**

**बयाणा रक्कम (EMD):** निविदाकाराने निविदेसोबत रु. 5,000/- (रुपये पाच हजार फक्त) इतक्या रकमेची बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्ट (DD) किंवा

पे-ऑर्डरद्वारे "धर्मदाय उपायुक्त, जळगाव" यांच्या नावे सादर करणे बंधनकारक आहे. बयाणा रकमेविना प्राप्त निविदा विचारात घेतली जाणार नाही. अयशस्वी निविदाकारांना बयाणा रक्कम परत केली जाईल.

**सुरक्षा ठेव (Security Deposit):** यशस्वी निविदा धारकास कार्यादेश मिळाल्यानंतर 7 दिवसांच्या आत एकूण वार्षिक कराराच्या 3% रकमेची सुरक्षा ठेव कार्यालयाकडे जमा करावी लागेल. ही रक्कम कंत्राट कालावधी यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.

**कंत्राट कालावधी :** सदर कंत्राट सुरुवातीला 11 महिन्यांच्या कालावधीसाठी असेल. संस्थेचे काम समाधानकारक असल्यास आणि कार्यालयाची आवश्यकता असल्यास, दोन्ही पक्षांच्या संमतीने मुदतवाढ दिली जाऊ शकते.

**अधिकार:** कोणताही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार धर्मदाय उपायुक्त, जळगाव यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीकडे राखून ठेवला आहे.

**वाद निवारण:** निविदेसंदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास, तो जळगाव न्यायालयाच्या कार्यक्षेत्राच्या अधीन राहील.

**भाग-ब :**

तांत्रिक पात्रता (लिफाफा क्र. 1 मध्ये सादर करावयाची कागदपत्रे)

खालील सर्व कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित (Self-attested) प्रती सादर करणे बंधनकारक आहे:

1. संस्थेची नोंदणी : कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्था ही कंपनी कायदा / सहकारी संस्था नोंदणी अधिनियम / भागीदारी कायदा किंवा शॉप ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत असल्याचा पुरावा.

2. मनुष्यबळ पुरवठ्याचा अनुभव: मनुष्यबळ पुरवठा करण्याचा किमान 3 वर्षांचा अनुभव असल्याचा पुरावा. शासकीय/निमशासकीय कार्यालयांना सेवा पुरवल्या

असल्यास, संबंधित कार्यादेशाच्या प्रती जोडाव्यात.

3. आर्थिक स्थिती: मागील 3 वर्षांचे आयकर विवरणपत्र (ITR) भरल्याच्या पावत्या आणि वार्षिक उलाढालीचा (Turnover) तपशील.

**कायदेशीर नोंदणी:**

4. वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

5. भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

6. राज्य कामगार विमा (ESIC) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

7. व्यवसाय कर (PTEC/PTRC) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

8. पॅन कार्ड: संस्थेच्या/कंपनीच्या पॅन कार्डची प्रत.

9. हमीपत्र (Undertaking): कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्था यांना कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाने काळ्या यादीत (Blacklist) टाकलेले नाही किंवा संस्थेविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही, अशा आशयाचे 100 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवरील हमीपत्र.

10. बयाणा रकमेचा पुरावा: बयाणा रकमेचा मूळ डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर.

**भाग-क :**

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

1. शिपाई (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) निविदेचे सिलबंद लिफाफे या कार्यालयाच्या आवज/जावक शाखेकडे कार्यालयीन वेळेत निविदा प्रक्रीया कार्यक्रमात नमुद तारखेपर्यंत स्विकारले जातील. अंतिम दिनांक ०९.१०.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यंत निविदा आवक/जावक विभागात स्विकारल्या जातील. कोणत्याही परिस्थितीमध्ये विहीत तारीख व वेळेनंतर आलेल्या निविदांचा स्वीकार केला जाणार नाही.

2. कंत्राटी सेवकाचे शिपाई (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी)या पदाकरिता 12 वी उत्तीर्ण, पदवीधर असल्यास प्राधान्य चार चाकी वाहन चालविण्याचा परवाना असल्यास प्राधान्य याप्रमाणे निकष राहील.

3. पुरविण्यात येणारा शिपाई (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) शारीरिकदृष्ट्या सक्षम, निरोगी आणि चांगल्या वर्तणुकीचा असावा. त्याचे वय 18 ते 45 वर्षांदरम्यान असावे.

4. व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या सेवकास नियुक्ती देता येणार नाही. त्याबाबतीत नियुक्त कर्मचाऱ्याची पोलीस चारित्र्य पडताळणी (Police Verification) करून त्याचा अहवाल संबंधित कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्था यांनी कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल.

5. कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्था यांचेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

6. नियुक्त कर्मचारी हा संस्थेचा/एजन्सीचा कर्मचारी असेल. त्याचे कार्यालयाशी मालक-सेवक असे नाते राहणार नाही व तो शासनाच्या सेवेत सामावून घेण्यासाठी पात्र राहणार नाही.

7. कर्मचाऱ्याचे वेतन, भविष्य निर्वाह निधी (PF), राज्य कामगार विमा (ESIC), बोनस आणि इतर सर्व वैधानिक देणी वेळेवर अदा करण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची असेल.

8. प्रत्येक महिन्याचे वेतन पुढील महिन्याच्या 7 तारखेपर्यंत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात जमा करणे आणि त्याची पावती (उदा. PF/ESIC चलन) कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल. बिल सादर करताना या पावत्या जोडणे आवश्यक आहे.

9. संस्थेने कर्मचाऱ्याला ओळखपत्र व गणवेश (Uniform) पुरवणे बंधनकारक आहे.

10. कर्मचारी रजेवर किंवा गैरहजर असल्यास, संस्थेने तात्काळ पर्यायी व्यवस्था करावी, अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल.

11. बेशिस्त वर्तन करणाऱ्या कर्मच्याऱ्यास या कार्यालयाने निर्देशित केल्यावर त्वरित काढून टाकावे लागेल व पर्यायी व्यवस्था करावी लागेल. कुठल्याही परिस्थितीत पर्यायी व्यवस्था न केल्यास संबंधित कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्था यांना प्रतीदिवशी मनुष्याबळाचे प्रतिदिन वेतन याप्रमाणे दंडात्मक कारवाई केली जाईल व सदरचा दंड अनामत रकमेमधून वसुल केला जाईल.

12. उपरोक्त पदाच्या सेवेसाठी प्रत्येक माणसाकरिता आकारण्यात आलेला दर हा

किमान वेतन कायदा 1948 प्रमाणे असावा.

13. शिपाई (बहुददेशीय गट-ड कर्मचारी) यांना शासन निर्णय क्र.-सीएचअे-२०२३/प्र.क्र.३८/का.1 दिनांक ०९.०३.२०२३ मधील परिशिष्ठ-क नमुद बहुददेशीय गट-ड कर्मचारी संवर्गामध्ये नमुद केलेल्या कोणत्याही संवर्गाचे काम करणे बंधनकारक राहील.

14. नियुक्त केलेल्या व्यक्तीला आठवडयातून एक दिवस साप्ताहित अवकाश राहील आणि वेतनामध्ये साप्ताहिक अवकाशाचा समावेश राहिल तसेच एका दिवशी एकापेक्षा अधिक सेवकांना साप्ताहित सुटी देय राहणार नाही.

15. कंत्राटी सेवकास अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

16. कार्यालयाच्या मालमत्तेचे कर्मचाऱ्याकडून कोणतेही नुकसान झाल्यास, त्याची भरपाई करण्याची जबाबदारी संस्थेची असेल.

17. कार्यालयाने निश्चित केलेल्या कार्यालयीन शिस्तीचे व नियमांचे पालन करणे कर्मचाऱ्यास बंधनकारक राहील.

18. बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ नेमावयाच्या निविदा प्रक्रीयेला प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यावर कंत्राटदारास लेखी करार करावा लागेल.

19. सदरची निविदा प्रक्रीया राबवित असताना आवश्यकता असल्यास वेळोवेळी अटी व शर्तीमधील बदल करणेबाबत किंवा निविदा प्रक्रीया रदद करणेबाबत शुध्दीपत्रक किंवा सूचना ही निविदा दाखल करणाऱ्यांवर बंधनकारक राहील. असे शुध्दीपत्रक किंवा सूचना ही कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशीत करण्यत येईल.

20. करार संपुष्टात आणायचा असल्यास, दोन्ही पक्षांना एक महिन्याची लेखी नोटीस देणे बंधनकारक असेल.

21. सदरील निविदा सूचना (http://charity.maharashtra.gov.in) संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

वरील प्रमाणे निविदा प्रक्रिया कार्यक्रम ठरविणेबाबत व निविदा सूचना निर्गमित करणे तसेच निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविण्याबाबत विचार

विनिमय करण्यात आला आहे. वरील सर्व बाबींना समितीने एकमताने मंजुरी दिलेली असून ठराव संमत करण्यात आलेला आहे.

28/09/2026.  28/09/2026.

अध्यक्ष  सचिव

28/09/26  28/09/2026

1. सदस्य  2. सदस्य  3.सदस्य